एपी आर ५४२६०५१०

**आरबीआय/२००९-१०/४७४**

**एपी (डीआयआर मालिका) परिपत्रक क्र. ५४ मे २६ २०१०**

सर्व अधिकृत डीलर वर्ग १ बँका.

महोदया/महोदय,

**लॉटरी, धन प्रसार योजना, स्वस्त निधीच्या इतर ऑफर्स ह्यामध्ये भाग घेण्यासाठी प्रेषण**

अधिकृत डीलर वर्ग - १ (एडी कॅटॅगरी - १) बँकांचे लक्ष एपी (डीआयआर मालिका) परिपत्रक क्र. २२ दि. डिसेंबर ७,२००० ; एपी (डीआयआर मालिका) परिपत्रक क्र. ०२ दि. जुलै २७ २००१ ; आणि एपी (डीआयआर मालिका) परिपत्रक क्र. ४९ दि. जून ४, २००२ कडे वेधण्यात येत आहे. ह्यात सांगण्यात आले होते की, लॉटरी योजनांमध्ये भाग घेण्यासाठी कोणत्याही स्वरूपात प्रेषण करण्यास, विदेशी मुद्रा व्यवस्थापन अधिनियम, १९९९ खाली मनाई करण्यात आली आहे. ह्याशिवाय, हे निर्बंध, निरनिराळ्या नावांखाली, म्हणजे, धन प्रसार योजना, अशा लॉटरी योजनांमध्ये भाग घेण्यासाठी किंवा बक्षिसे/पारितोषिके मिळविण्यासाठी धन प्रेषण करण्याबाबतही लागु आहेत.

२) असे दिसून येत आहे की, अलिकडे ई-मेल्स, पत्रे , मोबाईल फोन्स, एसएमएस इत्यादींच्या मार्फत, स्वस्त निधीच्या खोट्या ऑफर्स लबाड लोकांकडून येऊ लागल्या आहेत. सावज बनविलेल्या लोकांना, रिझर्व बँकेच्या बनावट लेटर हेड्सवर उच्चतर अधिकाऱ्यांनी सह्या केल्याचे भासविणारी पत्रे, संदेश पाठविले जात आहेत. अनेक रहिवासी अशा लबाडीच्या ऑफर्सना बळी पडले असून त्यात त्यांनी प्रचंड पैसा गमाविला आहे. रिझर्व बँकेने वृत्तपत्रे, व इलेक्ट्रॉनिक माध्यमांच्या व्दारे ह्यापूर्वीच जनतेला ह्याबाबत सावधान केलेच आहे व ह्याशिवाय अशाच प्रकारच्या जनजागृती मोहिम राबविण्याची योजना आहे.

३) रिझर्व बँकेच्या असे नजरेस आणून देण्यात आले आहे की, हे फसवणूक करणारे लोक, भोळ्या लोकांकडून, प्रक्रिया शुल्क / व्यवहार शुल्क / कर परवानगी आकार / रूपांतरण आकार / परवानगी शुल्क इत्यादी नावांखाली पैसे वसूल करतात. अशा लुबाडणुकींना बळी पडणाऱ्या लोकांना असे पैसे भारतामधील बँकांमध्ये जमा करण्याबाबत मन वळविले जाण्याचे प्रकार आढळून आले आहेत. आणि असे पैसे लगेच काढून घेतले आहेत. व्यवहार शुल्क इत्यादी गोळा करण्यासाठी, व्यक्ती किंवा मालकी-कंपन्याच्या नावे निरनिराळ्या बँकांमध्ये अनेक खाती उघडण्यास आल्याचे दिसून आले आहे. ह्यासाठी एडी वर्ग - १ बँकांना सांगण्यात येत आहे की त्यांनी अशी खाती उघडते वेळी सावधानता ठेवून त्यामधील व्यवहारांबाबत दक्षता ठेवावी. येथे स्पष्ट करण्यात येत आहे की, अशी प्रदाने प्रत्यक्ष/अप्रत्यक्षपणे भारताबाहेर पाठविणाऱ्या/तसा प्रयत्न करणाऱ्या भारतामधील व्यक्तींवर, विदेशी मुद्रा व्यवसथापन अधिनियम १९९९ चे, तसेच तुमचा ग्राहक जाणा (केवायसी) निकषांच्या विनियमांचे आणि अँटी मनी लॉडरिंग मानकांचे (एएम एल) उल्लंघन केल्याबद्दल कायदेशीर कारवाई केली जाईल.

४) एडी वर्ग - १ बँकांनी ह्या परिपत्रकामधील मजकूर त्यांच्या खातेदारांच्या व संबंधित ग्राहकाच्या नजरेस आणावा. एडी वर्ग - १ बँकांनी, ‘‘फिक्टिशस ऑफर्स/लॉटरी विनिंग्ज/चीप फंड ऑफर्स वरील, भारतीय रिझर्व बँकेने डिसेंबर ०७, २००७ व जुलै ३०, २००९ रोजी दिलेल्या वृत्तपत्र वितरणाला आणि, वरील एपी. (डीआयआर मालिका) परिपत्रकांमधील सूचनांना मोठी प्रसिद्धी द्यावी.

५) ह्या परिपत्रकातील निदेश, विदेशी मुद्रा व्यवस्थापन अधिनियम, १९९९ च्या (१९९९ च्या ४२) कलम १०(४) व ११(१) खाली देण्यात आले आहेत.

आपला,
(सलिम गंगाधरन)
प्रभारी मुख्य महाव्यवस्थापक

**जुलै ३०,२००९**

**खोट्या ऑफर्स/लॉटरीची बक्षिसे/स्वस्त निधीच्या ऑफर्स ह्यापासून सावध रहा - आरबीआय**

भारतीय रिझर्व बँकेने आज पुनः स्पष्ट केले आहे की, लॉटरी – योजनांमध्ये भाग घेण्यासाठी कोणत्याही स्वरूपात प्रेषण करण्यास विदेशी मुद्रा व्यवस्थापन अधिनियम, १९९९ खाली मनाई करण्यात आली आहे. ह्याशिवाय हे निर्बंध, निरनिराळ्या नावांखाली (जसे मनी सर्क्युलेटिंग स्कीम,) चालु असलेल्या लॉरी समान योजनांसाठी, किंवा बक्षिसाची रक्कम/ पारितोषिके मिळविण्यासाठी प्रेषण करण्याबाबतही लागु आहे. रिझर्व बँकेने स्पष्ट केले आहे की, तिने असे निधी वाटण्यासाठी कोणत्याही व्यक्तीच्या कंपनीच्या / ट्रस्टच्या नावे कोणतेही खाते उघडलेले नाही आणि शिवाय ती कोणत्याही व्यक्तीला अशा प्रकारे रिझर्व बँकेत पैसे जमा करण्यासाठी खाते उघडण्याची परवानगी देत नाही. अशा खात्यात पैसे जमा झाल्याबाबत किंवा जमा असल्याबाबतचा पुरावा म्हणून ती कोणत्याही प्रकारची प्रमाणपत्रे किंवा सूचना किंवा दुजोरापत्रे देत नाही.

रिझर्व बँकेने जनतेला सांगितले आहे की, अशा खोट्या ऑफर्स / प्रतिनिधित्वांच्या आवाहनांना बळी पडून अशा खात्यात पैसे पाठवू अथवा जमा करू नयेत. अशा गुन्हेगारांवर गुन्हा दाखल करण्यासाठी, जनतेने अशा ऑफर्सची माहिती स्थानिक पोलिस प्राधिकरणांच्या नजरेस आणवी.

अनेक रहिवाशांनी अशा आकर्षक ऑफर्सना बळी पडून अलीकडील भूतकाळात स्वतःचे पैसे गमावल्याने रिझर्व बँक वरील सल्ला देत आहे.

भारतीय रिझर्व बँकेने पूर्वी ही अनेक वेळा जनतेला सावधानतेचा इशारा दिला होता की त्यांनी काही विशिष्ट विदेशी संस्था/ व्यक्ती, तसेच अशा संस्था / व्यक्तींचे प्रतिनिधी ह्यांच्या व्दारे केल्या जाणाऱ्या विदेशी मुद्रेमधील खोट्या ऑफर्स / लॉटरीची बक्षिसे / स्वस्त निधी पाठविणे इत्यादी अमिषांना बळी पडू नये. अशा आफर्स साधारणतः पत्रे, ई-मेल्स, मोबाईल फोन्स, एसएमएस इत्यादि मार्फत केल्या जातात.

भारतीय रिझर्व बँकेने स्पष्ट केले आहे की भूतकाळात योजिलेल्या कार्यरितीव्यतिरिक्त अशा लबाड लोकांनी आता, अशा ऑफर्स खऱ्या वाटाव्यात म्हणून, भारतीय रिझर्व बँकेच्या लेटरहेड्ससारख्याच दिसणाऱ्या लेटरहेड्सवर व तिच्या अधिकाऱ्यांनी केलेल्या / वरिष्ठांच्याच वाटाव्यात अशा सह्या केलेली प्रमाणपत्रे, पत्रे, परिपत्रके पाठविणे सुरु केले आहे. असे लबाड लोक, रिझर्व बँकेचे वरिष्ठ अधिकारी असल्याचे भासवून त्यांचे खोटे टेलिफोन क्रमांक / ई मेल आयडीज् देऊन त्यांच्या सावजांना फाशी पाडतात. अनेक लबाड लोकांनी तर भारतामधील बँकेत खाती उघडली असून, निरनिराळे आकार, कर, शुल्के ह्यासाठी त्या खात्यांमध्ये पैसे जमा केल्याबरोबर अशा ऑफर्स देणारे लोक ते पैसे भरण्यास सांगणे सुरू केले आहे. अशा खात्यात पैसे जमा केल्याबरोबर अशा ऑफर्स देणारे लोक ते पैसे काढून घेऊन गायब होतात. त्यामुळे सावज त्याने भरलेले पैसे गमावून बसते.

अल्पना किल्लावाला
मुख्य महाव्यवस्थापक

वृत्तपत्रांसाठी वितरणः २००९/१६८

**विदेशातील स्वस्त निधी प्रेषण करण्याबाबतच्या खोट्या ऑफर्सबाबत आरबीआय जनतेला सावधानतेचा इशारा देत आहे.**

भारतीय रिझर्व बँकेकडून जनतेला सांगण्यात येत आहे की त्यांनी, विदेशी संस्थांनी भारतामधील बँकांना / रिझर्व बँकेला पाठविलेल्या स्वस्त निधीच्या खोट्या ऑफर्सना बळी पडू नये. अनोळखी संस्थांकडून दिल्या जाणाऱ्या अशा योजना/ ऑफर्समध्ये भाग घेण्यासाठी जनतेने प्रेषणही करु नये.

अशा ऑफर्सची विशिष्ट कार्यरीत वर्णन करताना, रिझर्व बँकेकडून सांगण्यात आले की काही विशिष्ट विदेशी संस्था/ व्यक्ती किंवा त्या संस्था / व्यक्तींचे प्रतिनिधी म्हणून काम करणारे भारतीय रहिवासी, पत्रे/ ई मेल्स इत्यादिव्दारे, रहिवासी व्यक्ती/ संस्था (शाळा/ इस्पितळे ह्यासह) ह्यांना त्यांच्या भारतामधील धंदा/उद्योग ह्यांना मदत करण्याच्या बहाण्याने विदेशी चलनामधील प्रचंड पैशाच्या ऑफर्स देतात. एकदा संपर्क प्रस्थापित झाल्यावर, भारतीय व्यक्ती / संस्था ह्यांच्या बँक खात्याबाबतची माहिती कळविण्यासाठी आणि असे ऑफर्सचे पैसे पाठविता यावेत ह्यासाठी त्या खात्यात काही रक्कम जमा करण्याची विनंती केली जाते.
ह्याच प्रमाणे, अलिकडील भूतकाळात, काही व्यक्ती/ अधिकृत डीलर्स ह्यांच्याकडून, विदेशातील लॉटरी योजनेत मिळालेली बक्षिसे प्रत्यक्ष मिळविण्यासाठी विदेशी चलनात कमिशन/ शुल्क ह्यांचे प्रेषण करण्यासाठी मंजुरी/स्पष्टीकरणे मागणारे संदर्भही रिझर्व बँकेला मिळाले आहेत. रिझर्व बँकेच्या असेही नजरेस आले आहे की, काही विदेशी संस्था, भारतामधील व्यक्ती / कंपन्या / ट्रस्ट्स ह्यांना कळवित आहे की, भारत स्वस्त दराने कर्ज देण्यासाठी त्यांनी रिझर्व बँकेमधील एका खात्यात प्रचंड निधी ठेवलेला आहे आणि तो निधी रिझर्व बँकेच्या मंजुरीनंतरच वाटला जाईल. त्यांच्या म्हणण्याच्या पुष्ट्यर्थ अशी कामे करणारांकडून, रिझर्व बँकेव्दारा दिली गेली आहेत असे वाटणाऱ्या प्रमाणपत्रांच्या / ठेव पावतीच्या प्रतीही सादर केल्या जातात.

भारतीय रिझर्व बँक आज स्पष्ट करीत आहे की, लॉटरी योजनेत भाग घेण्यासाठी कोणत्याही प्रकारचे प्रेषण करण्यास, विदेशी मुद्रा व्यवस्थापन अधिनियम, १९९९ खाली मनाई करण्यात आली आहे. ह्याशिवाय हे निर्बंध, निरनिराळ्या नावांखाली (जसे मनी सर्क्युलेटिंग स्कीम,) चालु असलेल्या लॉरी समान योजनांसाठी, किंवा बक्षिसाची रक्कम/ पारितोषिके मिळविण्यासाठी प्रेषण करण्याबाबतही लागु आहे. रिझर्व बँकेने स्पष्ट केले आहे की, तिने असे निधी वाटण्यासाठी कोणत्याही व्यक्तीच्या कंपनीच्या / ट्रस्टच्या नावे कोणतेही खाते उघडलेले नाही आणि शिवाय ती कोणत्याही व्यक्तीला अशा प्रकारे रिझर्व बँकेत पैसे जमा करण्यासाठी खाते उघडण्याची परवानगी देत नाही. अशा खात्यात पैसे जमा झाल्याबाबत किंवा जमा असल्याबाबतचा पुरावा म्हणून ती कोणत्याही प्रकारची प्रमाणपत्रे किंवा सूचना किंवा दुजोरापत्रे देत नाही.

रिझर्व बँकेने जनतेला सांगितले आहे की, अशा खोट्या ऑफर्स / प्रतिनिधित्वांच्या आवाहनांना बळी पडून अशा खात्यात पैसे पाठवू अथवा जमा करू नयेत. अशा गुन्हेगारांवर गुन्हा दाखल करण्यासाठी, जनतेने अशा ऑफर्सची माहिती स्थानिक पोलिस प्राधिकरणांच्या नजरेस आणवी.

अनेक रहिवाशांनी अशा आकर्षक ऑफर्सना बळी पडून अलीकडील भूतकाळात स्वतःचे पैसे गमावल्याने रिझर्व बँक वरील सल्ला देत आहे.

भारतीय रिझर्व बँकेने पूर्वी ही अनेक वेळा जनतेला सावधानतेचा इशारा दिला होता की त्यांनी काही विशिष्ट विदेशी संस्था/ व्यक्ती, तसेच अशा संस्था / व्यक्तींचे प्रतिनिधी ह्यांच्याव्दारे केल्या जाणाऱ्या विदेशी मुद्रेमधील खोट्या ऑफर्स / लॉटरीची बक्षिसे / स्वस्त निधी पाठविणे इत्यादी आमिषांना बळी पडू नये. अशा आफर्स साधारणतः पत्रे, ई-मेल्स, मोबाईल फोन्स, एसएमएस इत्यादि मार्फत केल्या जातात.

भारतीय रिझर्व बँकेने स्पष्ट केले आहे की भूतकाळात योजिलेल्या कार्यरिती व्यतिरिक्त अशा लबाड लोकांनी आता, अशा ऑफर्स खऱ्या वाटाव्यात म्हणून, भारतीय रिझर्व बँकेच्या लेटरहेड्ससारख्याच दिसणाऱ्या लेटरहेड्सवर व तिच्या अधिकाऱ्यांनी केलेल्या / वरिष्ठांच्याच वाटाव्यात अशा सह्या केलेली प्रमाणपत्रे, पत्रे, परिपत्रके पाठविणे सुरु केले आहे. असे लबाड लोक, रिझर्व बँकेचे वरिष्ठ अधिकारी असल्याचे भासवून त्यांचे खोटे टेलिफोन क्रमांक / ई मेल आयडीज् देऊन त्यांच्या सावजांना फशी पाडतात. अनेक लबाड लोकांनी तर भारतामधील बँकेत खाती उघडली असून, निरनिराळे आकार, कर, शुल्के ह्यासाठी त्या खात्यांमध्ये पैसे जमा केल्याबरोबर अशा ऑफर्स देणारे लोक ते पैसे भरण्यास सांगणे सुरू केले आहे. अशा खात्यात पैसे जमा केल्याबरोबर अशा ऑफर्स देणारे लोक ते पैसे काढून घेऊन गायब होतात. त्यामुळे सावज त्याने भरलेले पैसे गमावून बसते.

**(जी.रघुराज)**

**२००७-२००८/७७०** वृत्तपत्रांसाठी वितरण

अधिक माहितीसाठी रिझर्व बँकेच्या वेबसाईटवरील (www.rbi.org.in) वाचवण्यासाठी रिझर्व बँक जनतेला विनंती करत आहे.